# प्रकरण चौथे

## गोखले यांचे राजकीय विचार

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

# प्रकरण चौथे

## गोखले यांचे राजकीय विचार

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस साऱ्या हिंदुस्थानमध्ये पुणे शहराला एक विशेष स्थान व महत्व प्राप्त झाले होते. १८९३ साली "राष्ट्रसभेचे जनक" ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम यांच्या सत्कारार्थ पुण्यात एक जाहीर सभा झाली. या सभेत भाषण करताना त्यांनी पुणेकरांचा पुढील शब्दामध्ये गौरव केला. ह्यूम म्हणाले, "पुण्याची बौध्दिक उंची असलेली साऱ्या भारतात चार-सहा शहरेदेखील आढळणार नाहीत. राष्ट्रसभेच्या कार्यक्रमपत्रिकेतील प्रत्येक बाब ज्यांना पूर्णपणे समजलेली आहे असे स्त्रीपुरुष पुण्यामध्ये हजारोंच्या संख्येने मिळतील." [१]

पेशवाईच्या उत्कर्षाच्या काळात साऱ्या हिंदुस्थानच्या राजकारणाची सुत्रे पुण्याहून हलत असत. गत इतिहासाचे भान असल्यामुळे पुणेकरांची राजकीय अस्मिता अधिक तीव्र होती. पण एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पुण्यात आढळणाऱ्या असामान्य राजकीय जागृतीचे श्रेय महादेव गोविंद रानडे यांच्याकडे जाते. पुण्यात या अलौकिक पुरुषाचे वीस वर्षाहून अधिक काळ वास्तव्य होते. रानड्यांच्या मार्गदर्शनाखालील पुण्याची सार्वजनिक सभा हिंदुस्थानातील एक अग्रगण्य राजकीय संघटना म्हणून उत्कर्ष पावली होती. पुण्याचे हे फार मोठे सद्भाग्य होते.

२ एप्रिल, १८७० रोजी सार्वजनिक सभेची पुण्यात स्थापना झाली. हिंदू कालगणनेनुसार शके १७९२ च्या चैत्री गुढीपाडव्याचा तो दिवस होता. त्या शुभमुहूर्तावर सार्वजनिक सभेचे पंचाण्णव संस्थापक सभासद एकत्र जमले होते. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील सुमारे ६००० लोकांनी त्यांची निवड केली होती. [२] औंध संस्थानचे अधिपती हे सार्वजनिक सभेचे पहिले अध्यक्ष होते. दख्खनचे अनेक संस्थानिक, सरदार व जहागिरदार यांचा सभेच्या आरंभीच्या आश्रयदात्यामध्ये

समावेश होता. जुन्या सरंजामशाही व्यवस्थेच्या पुनरुज्जीवनासाठी धडपडणारी व संस्थानिक-सरदार यांच्या गाऱ्हाण्याची दाद लावून घेणारी एक संघटना असे स्म सार्वजनिक सभेस प्राप्त होवू न देण्याचे मोठे श्रेय महादेव गोविंद रानडे यांच्याकडे जाते. इ.स. १८७१ मध्ये, म्हणजे सार्वजनिक सभेच्या स्थापनेनंतर वर्षभरातच, रानडयांची पुण्यास सबजज्ज म्हणून नेमणूक झाली. त्यांच्या देशोध्दाराच्या तळमळीला आणि बौध्दिक कर्तृत्वाला न्यायाधिशाच्या नोकरीत समाधानकारक वाव मिळत नव्हता. त्यासाठी सार्वजनिक सभेचे व्यासपीठ अत्यंत योग्य व उपकारक ठरले. गणेश वासुदेव जोशी हे सार्वजनिक सभेचे एक संस्थापक व चिटणीस होते. सार्वजनिक सभेची धुरा ते आपल्या खांद्यावर वहात होते. या तरुण न्याया-धीशाच्या अंगचे असामान्य गुण त्यांनी चटकन हेरले आणि रानडयांच्या हाती नेतृत्त्वाची सुत्रे आनंदाने सोपविली. सरकारी नोकर असल्यामुळे राजकीय स्वरुपाच्या संघटनेत रानडे कोणतेही पद स्वीकारु शकत नव्हते. सार्वजनिक सभेच्या कामकाजाची सुत्रे ते पडद्याआड राहून चालवित असत.

हाउस ऑफ कॉमन्सवर पंधरा प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क हिंदी जनतेला मिळावा, यासाठी १८७४ साली सार्वजनिक सभेने ब्रिटिश पार्लमेंटला अर्ज सादर केला.[3] त्याचवर्षी, बडोदा संस्थानचे अधिपती मल्हारराव गायकवाड यांच्या बचावासाठी निधी गोळा करण्याचा संकल्प सार्वजनिक सभेने जाहीर केला. ब्रिटिश रेसिडेंटवर विषप्रयोग केल्याचा आरोप बडोदा नरेशांवर ठेवण्यात आला होता. सभेची ही धिटाई सरकारला आवडणारी नव्हतीच. सरकारची गैरमर्जी ओढवून घेणारी ही पावले होती. सर रिचर्ड टेंपल यांनी व्हाइसरॉय लिटन याना लिहिले, "सार्वजनिक सभा हे नाव धारण करणाऱ्या, दख्खनच्या जमीन-दारांच्या संघटनेच्या हालचाली बऱ्याच काळापासून संशयास पात्र ठरल्या आहेत, ही गोष्ट हुजुरांस ठाऊक आहेच. त्या अद्यापिही संशयास्पदच आहेत... पूर्वग्रह-दूषित मनाच्या व्यक्ती पडद्याआडून सूत्रचालन करीत आहेत असे म्हटले जाते.[४]

सनदशीर घटनात्मक मार्गानीच गाऱ्हाण्यांची दाद लावून घ्यायची या

भूमिकेस सार्वजनिक सभा सर्वस्वी वचनबद्ध होती. अशा सभेविषयी, ती एक बंडाळीचे गुप्त राजकारण करणारी संघटना आहे, असा गैरसमज करून घेतला जावा, ही गोष्ट हास्यास्पद वाटते. एक मध्यमवर्गीय कंपूच सभेच्या पाठीशी असून तो केवळ आपल्या वर्गीय स्वार्थाचे व संकुचित राजकारण खेळत आहे, हा अभिप्राय अर्थशून्य वाटतो.

सार्वजनिक सभेचे कामकाज पाहण्यासाठी आणि सभेचे त्रैमासिक चालविण्यासाठी रानड्यांना विश्वासू सहाय्यकांची गरज होती. त्यांच्या सुदैवाने त्यांना सभेचे चिटणीसपद सांभाळण्यासाठी अनेक चांगले सहकारी लाभले. इ.स.१८८० साली गणेश महादेव जोशी यांचा मृत्यू झाला. तोपर्यंत त्यांनी हे पद सांभाळले. त्यानंतर एस्.एच्. चिपळूणकर, शिवराम हरी साठे आणि शेवटी गोखले यांनी चिटणीसपदाची धुरा वाहिली.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये १८८५ साली झालेल्या एका समारंभाचे वेळी गोखल्यांना रानड्यांचे प्रथम दर्शन झाले. उभयतांची पहिली गाठभेट जरा विचित्र स्वरूपाची होती. रानड्यांजवळ निमंत्रणपत्रिका नव्हती. त्यावेळपावेतो त्यांनी रानड्यांना पाहिलेले नव्हते. त्यामुळे गोखल्यांनी रानड्यांना दरवाजातच अडविले. शिवराम हरी साठे यांनी मग गोखल्यांना रानड्यांची ओळख करून दिली.[५] गोखल्याविषयी आगरकर रानड्यांजवळ आधीच कौतुकाने बोलले होते. राजकीय कार्यात रस असलेला हा तरुण प्राध्यापक प्रथमदर्शनीच रानड्यांच्या मनात भरला. सार्वजनिक त्रैमासिकाचे संपादक म्हणून रानड्यांनी त्यांची निवड केली. गोखले त्यावेळी अवघे तेवीस वर्षांचे होते. सभेच्या त्रैमासिकाचे संपादकत्व हा मोठा बहुमान होता. आपले वय लहान असूनही, आणि आपण अननुभवी असूनही आपणास हा बहुमान दिला जात आहे. या गोष्टीचे भान गोखल्यांना होते.

सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकामध्ये सभेच्या बैठकांच्या वृत्तांताच्या जोडीला

महत्त्वाच्या प्रचलित विषयावर लेख प्रसिध्द होत असत. संपादनाच्या ओघात राजकीय स्वरूपाचे गंभीर, विवेचक लेखन करण्याचे पाठ गोखल्यांना मिळाले. तसेच हिंदी माणसांचे लक्ष देशासमोरील ज्या प्रश्नावर केंद्रित झालेले होते त्या प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. खुद्द गोखल्यानीच असे लिहून ठेवले आहे की, त्रैमासिकांतील जवळपास दोन-तृतीयांश मजकूर रानडे स्वत:चे नाव न घालता लिहित आणि बाकीचा मजकूर त्यांनी पाहून सुधारलेला असे.[६] रानडे हे काटेकोरपणे परीक्षा करणारे होते. तपासून घेतल्याशिवाय कोणतीही माहिती ते प्रसिध्द करू देत नसत. कोणतेही विधान निष्काळजीपणाने केले जावू नये याबाबत दक्ष असत.

ॲलन ऑक्टेव्हियन ह्यूम, दादाभाई नौरोजी, विल्यम वेडरबर्न आणि फिरोजशाह मेथा यांचा रानड्यावर पूर्ण विश्वास होता. काँग्रेसच्या नेत्यांना रानड्याविषयी कमालीचा आदर वाटत असे. अशा या रानड्यांचे पट्टशिष्य म्हणून ओळखले जाणे, गोखल्याना फार लाभदायी ठरले. रानड्यांच्या हाता-खाली गोखल्यांनी जवळ जवळ चौदा वर्षे उमेदवारी केली. त्यांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व अंतर्बाह्य घडले. किंबहुना, गोखल्यांच्या गुरूंचे व्यक्तित्व आणि बौध्दिक ठेवण जाणून घेतल्याखेरीज गोखल्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व राजकारणाचा पुढील काळात झालेला आविष्कार समजू शकतच नाही. गोखल्यांनी रानड्यांचे शिष्यत्व पत्करले, त्या वेळी रानड्यांचे वय पंचेचाळीसच्या आसपास होते. त्यांचा राजकीय प्रभाव आणि त्यांचे बौध्दिक कर्तृत्व यांनी या सुमारास कळस गाठला होता. सार्व-जनिक सभा या प्रमुख राजकीय सभेचे ते सूत्रधार होते. सभेच्या मागचे डोके त्यांचेच होते. पश्चिम हिंदुस्थानातील सर्व चळवळीमागे रानडे हीच खरी शक्ती असते, त्यांच्याच धोरणाने सर्व कांही चाललेले असते, अशा शब्दामध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी रानड्यांच्या स्थानाचे महत्त्व वर्णिले आहे.[७] त्यांच्या पूर्वीच्या काळा-तील राजा राममोहन रॉय आणि नंतरच्या काळातील महात्मा गांधी यांच्याशी रानड्यांचे साम्य आहे. हिंदी समाजापुढील पेचप्रसंग संपूर्णपणे, सर्वांगांनी जाणून

घेण्याची दृष्टी त्यांनी बाळगलेली दिसते. राजकारण व अर्थकारण, समाजकारण व धर्मकारण यांचा कप्पेबंद, अलग अलग विचार त्यांनी केला नाही.

इ.स. १९०० साली मुंबई येथे भरलेल्या प्रांतिक सामाजिक परिषदेच्या प्रसंगी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले -

> "जोपर्यंत (स्वराज्याचे) राजकीय हक्क प्राप्त झालेले नाहीत व ते प्राप्त होत नाहीत, तोपर्यंत समाजव्यवस्थेला प्रगत व उन्नत रूप प्राप्त होणे शक्य नाही. उलटपक्षी, जोवर समाजजीवनांत विवेक व न्याय तत्त्वांचा आढळ होत नाही, तोवर राजकीय हक्क व अधिकार राबविण्यास समाजाच्या ठिकाणी पात्रता उत्पन्न होत नाही. जोवर सामाजिक व्यवहारांची मांडणी सदोष आहे तोवर चांगली, सर्वांचे कल्याण साधणारी आर्थिक व्यवस्था अस्तित्वात येवू शकत नाही. जर समाजापुढील धार्मिक ध्येय-कल्पना व साध्ये हीन व भ्रष्ट बनलेली असतील, आणि ती तशीच राहणार असतील तर, सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांमध्ये समाजाचे पाऊल पुढे पडू शकत नाही. हा अन्योन्याश्रय केवळ योगायोगाचा भाग नाही. तर समाजाच्या धारणेचा व प्रगती-परागतीचा तो अटळ नियमच आहे."[८]

न्या रानडे यांचे भारतीय जीवनातील स्थान महत्वपूर्ण आहे. १८७० ते १९०१ या काळात भारतीयांच्या जीवनाचा वैचारिक पायाभरणीचे कार्य त्यानी केले. अंधश्रध्दा व रूढी यांच्या जाळ्याजळमटात सापडून हिंदू समाजाचा जीव गुदमरत होता. पाश्चात्य ज्ञानाचे वारे मोकळेपणाने वाहिले तर ही जाळीजळमटे झटकली जातील अशी आशा रानड्यांना वाटत होती. यासाठी त्यांनी पाश्चात्य विद्येचे येथे मन:पूर्वक स्वागत केले. पण रानड्यांना पाश्चात्य गोष्टींचे आंधळे कौतुक नव्हते. जे जे पाश्चात्य ते ते अनुकरण करण्यास योग्य, असे रानडे मानीत नव्हते. इंग्लिश समाजाच्या दृष्टीनेहितकारक ठरलेले प्रत्येक तत्त्व हिंदुस्थानच्या दृष्टीने हितकारक असेलच असे नाही. हा विवेक त्यांच्यापाशी होता. राजकीय क्षेत्रात

जबाबदार प्रातिनिधिक संस्था आणि ब्रिटनप्रमाणे वृतपत्रस्वातंत्र्य येथे अस्तित्वात येणे त्यांना सर्वस्वी इष्ट वाटत होते. पण अनिर्बंध स्पर्धेच्या तत्त्वावर आधारलेली बाजारपेठी अर्थव्यवस्थाच निर्विवाद इष्ट आहे अशी बहुतेक सर्व इंग्लिश माणसांची श्रध्दा असूनही, त्या धर्तीच्या अर्थव्यवस्थेचा येथे स्वीकार करणे हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने घातक आहे असे रानडयांचे मत होते.[९]

लेख लिहिणे, व्याख्याने देणे एवढयावरच रानडे समाधान मानणारे नव्हते. निष्ठावान माणसे आणि अनुरुप रीती व संस्था यांच्या द्वारेच राजकीय, सामाजिक व आर्थिक इतकेच नाहीतर धार्मिक साध्ये गाठता येतात, याची त्यांना पुरती जाण होती. सरकारने डोळ्यांवर कातडे ओढून घेतले होते तर जनता उदासीन होती. या तटबंध्या भेदून सरकार व प्रजा या दोघांतही प्रबोधन घडण्यासाठी अविश्रांत व अखंड मोहिम चालविणे हा एकच उपाय होता. यासाठी केवळ वेगवेगळ्या संस्थांची उभारणी पुरेशी नव्हती. त्या संस्थांचे कामकाज चालविण्यासाठी ध्येयनिष्ठ कार्यकर्ते हवे होते. आयुष्यभर अशा ध्येयनिष्ठ, होतकरु तरुणांचा शोध रानडे घेत राहिले. त्यांच्या हाती लागलेला सर्वात उत्तम तरुण म्हणजे गोपाळ कृष्ण गोखले होय.

रानडयांच्या सहवासात येणाऱ्या तरुणांना आपण एका "थोर महात्म्याच्या सहवासात" आल्याची अनुभूती येई. त्याच्यासमोर "हीन विकाराचे" दर्शन करणारी भाषा तर त्यांच्या तोंडात येत नसेच, पण क्षुद्र विचार मनातदेखील आणण्यास हे तरुण धजत नसत.[१०] असे गोखल्यांनी म्हंटले आहे. रानडयांचा वाटत असलेला धाक आणि त्यांच्याविषयीची पूज्यबुध्दी, या दोन्हीविषयी गोखल्यानी आपले मनोगत वेळोवेळी व्यक्त केले आहे. "जगाचा उध्दार करण्यासाठी विधाता पृथ्वीवर आपल्या खास मर्जीतली माणसें पाठवीत असतो.[११] रानडे त्यांच्यापैकी एक होत. असे त्यांनी एका ठिकाणी म्हंटले आहे. कांही शतकांपूर्वी रानडयांचा जन्म झाला असता तर "त्यांची गणना ईश्वरी अवतारांमध्ये नक्कीच झाली असती" [१२] असेही ते म्हणाले आहेत.

देशभक्ती, सचोटी, उद्योगशीलता, चिकाटी आणि निगर्वीपणा या रानड्यांच्या गुणांची गोखल्यावर मोहिनी पडली. रानड्यांच्या शब्द-कोशामध्ये "मी", "माझे", "मला" हे शब्दच नव्हते असे गोखल्यांनी म्हटले आहे. आपणास प्रसिद्धी मिळावी, आपले नाव सर्वत्र व्हावे असे त्यांना वाटत नव्हते. सार्वजनिक जीवनाला त्यांनी आंतरिक निष्ठेने पूर्णतया वाहून घेतले होते आणि अत्यंत जबाबदारपूर्वक काम करण्याची त्यांची वृत्ती होती.

रानड्यांचे आपल्यावरील ऋण गोखले सदैव सांगत असत. इ.स.१८९७ साली वेल्बी कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी गोखले डेक्कन सभेचे सेक्रेटरी या नात्याने विलायतेला गेले त्यांची ती साक्ष फार गाजली. त्यांची सर्वत्र प्रशंसा झाली. हे त्यांचे मोठे यश होते. या यशाच्या क्षणी, "फोडिले भांडार, धन्याचा तो माल, मी तो हमाल, भारवाही" अशीच गोखल्यांची भावना राहिली.[१३] गुरूला शोभेल अशीच ही नम्रता होती. मात्र हा वाहक असा होता की, माल वाहून नेत असतांना त्या मालाच्या गुणवत्तेमध्ये तो भरच घालीत असे.

गोखले यांचे राजकीय विचार :

ना. गोखले यांच्या विचारावर न्या. रानडे यांच्या विचाराचा प्रभाव पडलेला होता. ना. गोखले यांचे राजकीय विचार पुढीलप्रमाणे -

ईश्वरी योगायोगाचे तत्त्वज्ञान :

पेशवाईच्या अस्तानंतरच्या जवळ-जवळ साठ वर्षांच्या काळात इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान मानणाऱ्या सुशिक्षितांची संख्या महाराष्ट्रात जास्त होती.[१४] ईश्वराने प्रेरणा दिल्यामुळे इंग्रज हिंदुस्थानात आले अशी लोकहितवादींची कल्पना होती. तिच्या पाठीमागे खूप विचार करून काढलेले तत्त्वज्ञान असावे असे वाटत नाही. महात्मा ज्योतिबा फुले यांचीही इंग्रजी राजवटीबद्दल अशीच भावना होती. ती त्यांनी मिशनऱ्याकडून घेतलेली असावी असे वाटते. पण या प्राथमिक

समजूतीला ईश्वरी योगायोगाच्या मोठया संस्कारीत तत्त्वज्ञानाचे स्वरूप पुढे रानडे आणि गोखले यांनी दिले. या दोघांची या योगायोगाबद्दल पक्की धारणा झालेली होती.

भारतात पुढे जो "लिबरल" पक्ष निर्माण झाला. त्याच्या विचार-सरणीच्या मुळांशी हे तत्त्वज्ञान होते. "लिबरल" हा शब्द उच्चारला की, आपल्याला इंग्लंडमधील लिबरल पक्षाची आठवण होते आणि ब्रिटिश लिबरल पक्षाच्या तत्त्वज्ञानाबद्दल आपले मन विचार करायला लागते. ब्रिटिश लिबरल पक्षाच्या तत्त्वज्ञानाचा पाया मील, बेन्थम, हर्बर्ट स्पेन्सर यांनी घातला. आपल्या-कडेही टिळक, आगरकरांच्यासारख्या विचारवंतावर मील, स्पेन्सर यांच्या तत्त्व-ज्ञानाचा परिणाम झाला होता. पण लिबरल पक्षाचे जे अध्वर्यू रानडे , गोखले यांचे राजकारण मात्र या ईश्वरी योगायोगाच्या तत्वज्ञानाने सिध्द झालेले होते.

रानडे-गोखल्यांच्या कार्यक्रमात जो सामाजिक सुधारणांना अग्रक्रम मिळत होता. त्याचेही कारण हे ईश्वरी योगायोगाचे तत्वज्ञानच होय. इंग्लंड देश खूप पुढारलेला होता आणि भारत खूप मागासलेला होता. पण ईश्वर दयाळू असल्यामुळे त्याने इंग्रजांना हिंदुस्थानात यावयाची प्रेरणा दिली. अखेरीस सर्व देश सारखेच सुधारले पाहिजेत तसे ते सुधारले म्हणजे मग त्या सर्वांचा एक राष्ट्रसंघ प्रस्थापित होईल. त्यामुळेच कित्येक भारतीय लिबरलांना वाटत असे की, राष्ट्रसंघाचे आद्य तत्त्वज्ञान आपण जगाला दिले.

सर्वांगीण सुधारणा हे रावसाहेब रानडयांचे ध्येय होते आणि धर्म हा या सर्वांगीण सुधारणेचा पाया होता. गोखल्यांचा सामाजिक अगर राजकीय विचार स्वतंत्रप्रज्ञ असा फारसा नव्हताच. त्यानी आपल्या कार्याची उभारणी बहुतांशी रावसाहेबांच्या तत्वप्रणालीवरच केली. तिचा विकास मात्र त्यांनी पुढे इतका केला की, गांधीजींना त्यानी आकर्षित करून घेतले. पण मुळ पाया रावसाहेब रानडयांच्या तत्त्वज्ञानाचाच होता. त्यांच्या ईश्वरी योगायोगाच्या तत्वज्ञानाने

ते इतके भारावून गेले होते की, रावसाहेबांच्या नंतर चार वर्षांनी त्यानी जो भारत सेवक समाज (सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी) स्थापन केला, त्याचे आद्य प्रमेय या ईश्वरी योगायोगाच्या तत्त्वज्ञानावर उभारले. ब्रिटिशांचा हिंदुस्थानशी संबंध दैवी योजनेमुळेच हिंदुस्थानच्या हितासाठी आला असे आद्य तत्त्व भारत सेवक समाजाच्या सभासदांनी मानले पाहिजे असे त्यांनी बजावले.[१५] या ईश्वरी योगायोगाच्या तत्त्वज्ञानावर ठाम उभे असल्यामुळेच "साम्राज्यांतर्गत स्वराज्य" असे भारतीय लिबरलांनी आपले पक्के ध्येय ठरविले. साम्राज्यातून फुटून बाहेर पडण्याची भाषा रावसाहेब रानडयांना फाजीलपणाची वाटे आणि ही भाषा निघाली की, हे शांतीस्वरूप थोर गृहस्थ विलक्षण संतापत असत.

हे ईश्वरी योगायोगाचे तत्त्वज्ञान टिळकांनी कधीच मानले नाही, हाच त्यांचा लिबरलाशी मोठा वादाचा आणि बखेडयाचा मुद्दा होता. ईश्वरानेच इंग्रज आणि हिंदुस्थानी याना एकत्र आणल्यामुळे या दोन लोकांमध्ये अंतिमदृष्टया हितविरोध असेल अशा विरोधाची योजना ईश्वर करील हेच लिबरल मुत्सद्याना वाटत नव्हते. त्यांची सारी राजकीय दृष्टी या श्रध्देने भारलेली होती. टिळक आणि त्यांचे जहाल अनुयायी यांच्यामध्ये जो राजकीय विरोध आला आणि रंगला त्याचे रहस्य या मुलभूत तात्त्वीक विसंवादात आहे. त्यामुळे भारतीयांचे कल्याण करण्याच्या ध्येयाने ब्रिटिश मुत्सदी प्रेरित झालेले असतील असे टिळकांना कधी वाटतच नसे. याच्या उलट ब्रिटन व भारत यांचे अंतिम हित एकच आहे. ब्रिटिश मुत्सदी भारताच्या हिताला बाधा आणीत असतील तर ती एक भूल आहे. ती दूर केली पाहिजे. त्यांची सद्सद्विवेकबुध्दी जागृत केली पाहिजे.अशी गोखल्याची श्रध्दा होती आणि त्यांचे सारे राजकारण हे अखेरीस ब्रिटिशांची सद्सद्विवेकबुध्दी जागृत करण्यासाठी चालत असे. दादाभाई नौरोजी हे लिबरातले जहाल समजले जात असत. ब्रिटिशांच्या पिळवणूकीने आणि लुटमारीमुळे हिंदुस्थान दिवसे दिवस भिकारी होत चालला आहे हे त्यांनी अचूक ओळखले. पण हे पिळवणूकीचे आणि लुटमारीचे धोरण "अ-ब्रिटिश" आहे असे त्यांनी आपल्या पुस्तकांच्या नावातच सांगून टाकले आहे.

रावसाहेब रानड्यांना हा लुटमारीचा मुद्दाही पटला नाही व हिंदुस्थानातून जे द्रव्य बाहेर इंग्लंडात जाते त्यामुळे भारतीयांच्या पदरांतही कांही मोबदला पडतोच असा युक्तीवाद त्यांनी केला. ब्रिटिश चक्क लुटमार करतात असे सिध्द झाले तर ज्या ईश्वराने ब्रिटिशांना हिंदुस्थानवासियांच्या कल्याणासाठी भारतात आणले. तो त्यांना अशी विरोधी प्रेरणा देईल तरी कसा ? [१६]

घटनात्मक चळवळीचा पुरस्कार :

गोखले नेमस्तांचे पुढारी होते. त्यांचा घटनात्मक सुधारणावर विश्वास होता. त्यांना क्रातीकारक मार्ग पसंत नव्हता. [१७] भारताने स्वराज्य घटनात्मक चळवळीने मिळविले पाहिजे अशी त्यांची दृढ श्रध्दा होती. पण घटनात्मक चळवळीची त्यांची कल्पना इतर भारतीय पुढा-यापेक्षा पुष्कळ समावेशक होती. रूढ समाजाप्रमाणे फक्त अर्जविनंत्यापुरती मर्यादित नव्हती. अलाहाबादच्या भाषणात त्यांनी घटनात्मक चळवळीची व्याख्या "ज्या कृतीमुळे आवश्यक ते फेरबदल घटनात्मक राजसत्तेकडून घडवून आणता येतात ती" अशी केली होती. याचा अर्थ असा की अनुकूल मार्ग अनुसरण्याचा हक्क होता. दुसरे म्हणजे इच्छित फेरबदल हे घटनात्मक राजसत्तेच्या कृतीनेच घडून येतात." पण त्यासाठी राजसत्तेवर लोकमताचे दडपण आणणे आवश्यक असते. यामध्ये अर्थातच हिंसेला थारा नाही. तसेच उघड बंड, परदेशीय सत्तेशी सूत्र किंवा गुन्हेगारीची कृत्ये यांचाही समावेश त्यात होत नाही." थोडक्यात म्हणजे या तीन गोष्टी सोडून उरलेले सर्व सनदशीर ठरते. गोखले पुढे म्हणतात, "पण सनदशीर आहे म्हणून आवश्यक किंवा शहाणपणाचे आहे असे नव्हे." या सर्वांचा अर्थ असा की, शासनावर आणलेल्या दडपणाचा परिणाम जनतेच्या शक्तीवर आणि निश्चयावर अवलंबून आहे. म्हणून ती शक्ती संघटित करणे आणि निश्चय दृढ करणे हे काम सर्व प्रथम महत्त्वाचे आहे.

ब्रिटिश राजसत्तेचे दुष्परिणाम गोखल्याना स्पष्ट दिसत होते. कॉंग्रेस-पुढील अध्यक्षीय भाषणात आणि नंतरही वेळोवेळी त्यांनी आपला दृष्टीकोन स्पष्ट केला होता. एका वंशाच्या लोकांना दुस-या वंशाच्या लोकांवर राज्य

करणे विशेषत: त्या दोन्ही वंशामध्ये बौध्दिक देणगी आणि एकंदर संस्कृती या दोन्हीमध्ये फारसा फरक नसल्यास शासित वंशाच्या दृष्टीने हजारो प्रकारे धोक्याचे असते, अशी त्यांची खात्री झालेली होती. पण हा धोका टाळण्यासाठी सामर्थ्यवान समाज जीवनाची वाट करणे आवश्यक आहे, हेही त्यांनी ओळखले होते. इंडियन नॅशनल काँग्रेसचे सहचिटणीस या नात्याने इ.स. १९०४ जुलैमध्ये त्यांनी मद्रासला भेट दिली. २५ जुलैला एका सभेमध्ये केलेल्या भाषणांत गोखल्यांनी आपल्या आकांक्षा पु-या होण्याच्या मार्गात किती प्रचंड अडचणी आहेत ते विशद केले. ते म्हणाले, "आपल्याला बलशाली नोकरशाहीशी सामना करावयाचा आहे. आपल्या पहिल्या हल्ल्यानेच ही नोकरशाही सत्ता आणि अधिकार सोडून देणार नाही. या नोकरशाहीची धोरण ठरविणारे आणि राज्य चालविणारे ब्रिटिश अधिकारी हे निवडक लोक असतात. त्यांच्यामध्ये शिस्त, सुसंघटना आणि एकमेकांच्या हितसंबंधाबद्दल तीव्र जाणीव असते. म्हणून त्यांना आपल्या सत्तेवर आलेल्या संकटाचा प्रतिकार संघटितपणे करता येतो. आपली स्थिती अगदी या विरुध्द आहे. आपले सामाजिक जीवन दुबळे आणि परिणामशून्य आहे. त्यामागे धैर्य आणि आत्मिक तेज नाही. आपण जे काम करतो त्यावर कोणाचीच विशेष श्रध्दा नाही. श्रध्दाहीन यांत्रिकतेने केलेल्या कार्याला मोठे यश आले नाही तर त्यात आश्चर्य काय ? होशी लोकांच्या राजकारणाचे दिवस या देशात आता राहिलेले नाहीत." [८]

अशीच मते त्यांनी इतर कांही राजकीय भाषणांतून मांडलेली आहेत. आपले सामाजिक जीवन सामर्थ्यशाली करुन राजकीय सत्तेवर त्यांचे दडपण आणणे ही गोष्ट सोपी नाही, याची जाणीव त्यांना होती, म्हणून राजकीय कार्यात जास्त उत्साहाने लोकांनी भाग घ्यावा आणि देशाच्या सेवेत आपले जीवन अर्पण करावे असें त्याना वाटे. आपले उद्दिष्ट साधण्याचा हाच एकमेव मार्ग होता. अशा कार्यात प्रथम पुष्कळ निराशा वाटयास येत असली तरी लक्ष्यावरील श्रध्दा कमी होण्याचे कारण नाही. मुख्य म्हणजे आपल्या लक्ष्याची नैतिक बाजू जास्त

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

महत्त्वाची असते. त्यामुळे जे नैतिक सामर्थ्य आपल्याला प्राप्त होते ते आपला चिरंजीव असा भाग बनते.[१९] विद्यमान राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणणे आपल्याला शक्य होवो अगर न होवो, समाजाचे जीवन राजकीय संस्थांच्या आवाक्याबाहेर असलेल्या विशाल आणि खोल पातळीवर असते. ते अपयशामध्ये देखील समृध्द होते, फक्त केलेला प्रयत्न हा सुयोग्य असला पाहिजे. त्यांनी वेळोवेळी केलेल्या या पुढील विधानाचा हाच खरा अर्थ आहे. ते विधान असे की, "भावी पिढ्या भारताची सेवा त्यांच्या यशाने आणि विजयाने करतील. कदाचित आपण ती आपल्या अपयशाने केली पाहिजे. कारण योग्य मार्गाने केलेल्या प्रयत्नांत आलेले अपयश देखील देशाचे सामर्थ्य वाढविते."[२०]

## नेमस्त राजकारणाचा उदय व विकास :

रेमंड रेकुली या फ्रेंच लेखकाने ब्रिटिश साम्राज्य सत्तेचा आढावा घेतांना असा अभिप्राय व्यक्त केला होता की, "ब्रिटिश जेथे जातात तेथे ते शांतता, भौतिक समृध्दी व सुव्यवस्था आणतात, पण भौतिक समृध्दीमुळे नव्या आशा-आकांक्षा निर्माण होतात. हे मात्र त्यांच्या लक्षात येत नाही. ज्या प्रमाणात लोकांच्या हाती पैसा येतो, त्या प्रमाणात त्यांच्यात स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण होते." [२१] हिंदुस्थानातही याचा अनुभव आला. ब्रिटिश सत्ता येथे स्थिर झाल्यानंतर स्वत:ला अनुकूल असा सुशिक्षितांचा वर्ग निर्माण करावा या विचाराने त्यानी इंग्रजी शिक्षणाची सोय केली. त्यामुळे समाजात जी जागृती झाली त्यातून कांही नव्या आधुनिक मूल्यावर अधिष्ठित अशा चळवळींचा व संघटनांचा जन्म झाला. तसेच नव्या प्रकारचे सामाजिक व राजकीय नेतृत्व निर्माण झाले. समाजाचे प्रश्न मांडण्याच्या व ते सोडविण्याच्या नव्या पध्दती निर्माण झाल्या. त्यातूनच अखेर "इंडियन नॅशनल कॉंग्रेसचा जन्म झाला" आणि भारतीय पातळीवर संघटित राजकारणाचा आरंभ झाला.[२२]

पुण्यातही डेक्कन एज्युकेशन सोसायटीत टिळक व आगरकर यांच्यात

उपस्थित झालेल्या भांडणाची परिणती पुण्याच्या सार्वजनिक जीवनात दोन पक्ष निर्माण होण्यात झाली. टिळक पक्ष आणि रानडे-गोखले पक्ष यांच्यातील मतभेदांना राजकीय जहाल आणि नेमस्त असे स्वरूप प्राप्त होवून नेमस्त पक्ष सार्वजनिक सभेतून बाहेर पडला व नेमस्त राजकारणासाठी डेक्कन सभेची स्थापना झाली.

सार्वजनिक सभेने दुष्काळ निवारणाची चळवळ जोरात सुरु केली. १८९६ च्या दुष्काळात "फॅमिन कोड" समजावून सांगता सांगता सारा बंदीपर्यंत चळवळ जावू लागली, असा सरकारला भास झाला. सार्वजनिक सभेच्या फिरत्या मुनिमावर खटले भरण्यात येवू लागले. पुढे एक-दोन वर्षातच सार्वजनिक सभेची सरकारमान्यता काढून घेण्यात आली. याच सुमारास पुण्यास प्लेगचा दंगा उसळला, रँड-आयर्स्ट यांचे खून, पुण्यावर प्युनिटिव्ह पोलीस, टिळकावर राजद्रोहाचा खटला वगैरे सर्व प्रकार झाले. या दडपशाहीच्या काळात जहाल-मवाळ हे भेद वाढतच गेले. टिळक सुटून आल्यावर थोड्याच दिवसांत ज्या लॉर्ड सँढर्स्ट यांच्या कारकिर्दीत वरील प्रकार झाले त्याना मानपत्र देण्याचा वाद सुरु झाला. सर्व नेमस्त पक्ष त्यांच्या स्मारकांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सामील झाला. आता राष्ट्रीय सभा आणि लोकांतील चळवळ यांची फारकत झाली होती. चळवळ बंद नव्हती. पण ती एकंदरीने राष्ट्रीय सभेमार्फत न चालता तिच्या बाहेर चालू होती. ह्यूम, वेडरबर्न, दादाभाई इंग्लंडातून संदेश पाठवित होते की, चळवळ करा, पण ते कार्य अंगावर कोण घेणार ? हा प्रश्न सुटत नव्हता.

यावेळी कर्झनशाही सुरु झाली होती. ना. गोखले वरिष्ठ कायदेमंडळात दरसाल सरकारच्या धोरणावर टिका करीत होते. पण कर्झनशाहीची बेपर्वाई वाढतच होती. अखेरीस १९०४ साली बंगालची फाळणी झाली व वंगभंगाची चळवळ स्वदेशी, बहिष्काराच्या रूपाने सुरु झाली, सरकारच्या धोरणाचा निषेध करण्याचे सर्व नेमस्त उपाय थकले. ना. गोखले इंग्लंडला जावून

शिष्टाई करून आले. त्यावेळी इंग्लंडमध्ये नवे उदारमतवादी मंत्रीमंडळ अधिकारावर आले होते. त्यामुळे आपणास सुधारणांचा नवा हप्ता मिळणे शक्य आहे, अशी आशा वाटू लागली.

वंगभंगाच्या चळवळीतून राष्ट्रात एक अपूर्व जागृतीची लाट उसळली व राष्ट्रीय अंत:करणाच्या या चळवळीतून नवे राष्ट्रीय राजकारण निर्माण होवू लागले. बंगालमध्ये श्री. बिपिनचंद्र पाल व श्री. अरविंद घोष यांनी जुन्या राजकारणाच्या मूळ पायावरच आघात करण्यास सुरवात केली आणि राष्ट्रीय राजकारणाची आमूलाग्र नवी उभारणी केली पाहिजे असा युक्तीवाद करण्यास आरंभ झाला.[२३]

कॉंग्रेसचे विसावे अधिवेशन इ.स. १९०४ मध्ये मुंबई येथे सर हेन्री कॉटन यांच्या अध्यक्षतेखाली भरले.[२४] तिथे स्वागताध्यक्ष सर फिरोजशहा मेहता हे होते. त्यांचे भाषण मागील प्रथेस धरून झाले. पण त्यांच्या भाषणातील देशभक्तीच्या राजनिष्ठ संप्रदायावर बिपिनबाबूंनी उघडपणे टिका करण्यास सुरुवात केली. राजद्रोहाच्या कायद्याची मर्यादा उल्लंघन करावयाची नाही या दृष्टीने आम्हीही राजनिष्ठ असलो तरी हा राष्ट्रीय राजकारणाचा मूळ आधार किंवा पाया कधीच होवू शकणार नाही व तिचे फाजिल प्रदर्शन करण्यात कांही अर्थ नाही असे त्यांचे म्हणणे होते. देशात हा जो एक राष्ट्रीय राजकारणाचा नवा संप्रदाय निर्माण होत होता. त्याला राष्ट्रीय सभेत कोणते स्थान द्यावयाचे हा प्रश्न १९०५ सालापासून राष्ट्रीय सभेच्या सुत्रधारापुढे आला व त्याच्या निर्णयावर त्या सभेचे पुढील धोरण आणि भवितव्य अवलंबून राहावयाचे होते. हा निर्णय १९०७ साली सुरतेच्या अधिवेशनात लागला आणि नव्या-जुन्या पक्षाना एकत्र काम करणे शक्य नाही असे ठरले. त्यापूर्वीच १९०५ साली ना.गोखले बनारस येथील राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले.[२५] व तेव्हापासून तिचे एक प्रमुख सूत्रचालक बनले. हे त्यांचे स्थान राष्ट्रीय सभेत १९१५ पर्यंत म्हणजेच त्यांचा निधनापर्यंत कायम होते.

अशा परिस्थितीत बनारसची राष्ट्रीय सभा भरली होती. बंगालच्या तरुणांना यावेळी प्रिन्स ऑफ वेल्सच्या स्वागताचा ठराव हाणून पाडावयाचा होता. तसे झाल्यास आपण अध्यक्षपद सोडून देवूं असे ना. गोखले यांचे म्हणणे होते. प्रकरण हातघाईला येताच टिळकांनी मध्यस्थी केली. त्या ठरावाच्या वेळी बंगाली प्रतिनिधींनी उपस्थित राहू नये असा सल्ला टिळकांनी दिला व अध्यक्षांची बाजू सावरून धरली. [२६]

बंगालमधील परदेशी मालाच्या बहिष्काराच्या चळवळीचा उल्लेख दडपशाहीच्या निषेधाच्या ठरावात,"हे एक निर्वाणीचे, पण परिणामकारक सनदशीर निषेधाचे शस्त्र आहे व त्याचा उपयोग हिंदुस्थान-सरकारच्या कृत्याकडे ब्रिटिश लोकांचे लक्ष वेधून घेण्याच्या कामी होतो." [२७] असा ओझरता करण्यात आला. अशारितीने बनारसची राष्ट्रीय सभा लोकमान्यांच्या मध्यस्थीने पार पडली, पण त्याचवेळी ना. गोखले हे जुन्या पक्षाचे नवे पुढारी आणि लो.टिळक हे नव्या पक्षाचे पुढारी अशी स्थिती निर्माण झाली. बंगाली पुढाऱ्यांचे एवढ्याने समाधान होणार नव्हते. त्यांना संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय आणि विलायती सरकार व विलायती माल यांच्यावर बहिष्कार अशी नवी दिशा राष्ट्रीय राजकारणाला लावावयाची होती. लोकमान्यांच्या मते ही गोष्ट एक-दोन वर्षात जुन्या नव्यांच्या तडजोडीने घडवून आणणे अपरिहार्य व आवश्यक होते. तर उलट ना.गोखले यांना हे संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय व त्याला बहिष्काराचे अधिष्ठान स्विकारण्यामुळे राष्ट्रीय सभेची वाताहत होईल अशी भिती वाटत होती. आपल्या सर्व चळवळीचे जुने अधिष्ठान साम्राज्यनिष्ठा हेच असून, सरकारविरुध्द बहिष्काराची भावना सतत कायम ठेवणे हे अव्यवहार्य आणि अनर्थावह आहे, असे त्याना वाटत होते. त्यातून ही बहिष्काराची चळवळ पूर्ण शांततेच्या व नि:शस्त्र प्रतिकाराच्या पायावर आपण चालवू असे तिचे पुढारी म्हणत असले तरी, सरकार तिला तशी टिकू देणार नाही व अखेरीस तिच्यातून अत्याचारी चळवळ निपेल, असेही त्यांचे मत होते. लोकांतील प्रतिकारभावना विशिष्ट मर्यादेपर्यंत शांततेच्या आवरणांत राहिली तरी दडपशाहीचा जुलूम असह्य

झाल्यावर हे आवरण फोडून ती शांततेच्या कक्षेबाहेर जाते व त्यामुळे सर्वच संघटित उघडया चळवळी बंद पडून तरुणांची मात्र त्यात होळी होते असे नामदारांचे मत होते. त्यामुळे आपल्या चळवळीचे जुने अधिष्ठान बदलू द्यावयाचे नाही, असा त्यांचा प्रामाणिक देशभक्तीचा आग्रह होता. याच्या उलट बंगाली राष्ट्रीय पक्षाला राष्ट्रीय सभेत योग्य स्थान देवून त्याच्यावर जबाबदारी टाकीत गेले तरच राजकारणाला तेज चढून चळवळी दोघांच्या देवाण घेवाणींने शांतपणे व जोमाने चालू राहिल, असे लोकमान्यांचे राजकारण होते.

मवाळ व जहाल गट :

काँग्रेसमधील मवाळ आणि जहाल गटांच्या कार्याचे मूल्यमापन अर्वाचीन भारताच्या इतिहासकारांनी आपापल्या विचारधारणेनुसार केले आहे. कांहीनी मवाळांच्या कार्याचे महत्व प्रतिपादन करुन जहालांचा मार्ग त्याकाळी अव्यवहार्य होता असे म्हटले आहे, तर कांहीनी जहालांचा नि:शस्त्र प्रतिकाराचा मार्ग हाच राष्ट्रीय चळवळ परिणामकारक बनविण्याचा योग्य मार्ग होता व सुखासीन आयुष्य सोडून तो मार्ग पत्करण्याचे नैतिक धैर्य मवाळ नेत्यांत नव्हते असे विधान करुन मवाळांना दोष दिला आहे. [२८]

मवाळ गट :

ज्या काळी ब्रिटिश साम्राज्यशाही ऐन भरात होती, ब्रिटिश लष्करी बळाच्या प्रदर्शनाने लोक हतबुध्द झाले होते आणि भारतीयावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द क्वचित कोठे एखादा दुसरा निषेधाचा सूर उठत होता, अशावेळी राजकीय विषयांची चर्चा करणारी एक राष्ट्रीय सभा प्रस्थापित करण्याचे कार्य ज्येष्ठ नेत्यांनी केले. तसेच काँग्रेसच्या व्यासपीठावरुन ब्रिटिश सत्तेप्रती वारंवार निष्ठा प्रगट करीत कां होईना पण शासकीय जुलूम व अन्यायाला त्यांनी सतत प्रखर शब्दात वाचा फोडली. शिवाय सरकारची काँग्रेसवर मर्जी झाल्याचे आढळून

आल्यानंतरही शासकीय अन्यायावर टीका करण्यास ते कचरले नाहीत. संधी मिळेल त्यावेळी दादाभाई, सुरेंद्रनाथ, गोखले यांनी भारताची दयनीय आर्थिक स्थिती सरकारच्या नजरेस आणून देऊन त्याबद्दल शासकीय धोरण जबाबदार असल्याचे मत परखड शब्दात व्यक्त केले.

ब्रिटिश जनतेत भारतीय प्रश्नाबाबत जागृती निर्माण करण्याचा, ब्रिटिश मुत्सद्यांना भारतीय समस्या सोडविण्याची निकड पटवून देण्याचा व त्या समस्यांचे निराकरण करण्यास त्यांना प्रवृत्त करण्याचा त्यानी प्रयत्न केला. कॉंग्रेस ही बुध्दिजीवी वर्गाची संघटना न बनविता, कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून त्यांनी राष्ट्रीय प्रश्नांना हात घातला. जाती, वंश, धर्म इत्यादि भेदांच्या पलीकडे जावून त्यांनी राष्ट्रीय ऐक्याच्या निर्मितीला हातभार लावला. हे ज्येष्ठ मवाळ नेत्यांचे कार्य निश्चितच प्रशंसनीय होते. मात्र ज्या परिस्थितीत ते वाढले व ज्या प्रकारचे शिक्षण त्यांनी घेतले त्यामुळे त्यांच्या विचारांची एक निश्चित ठेवण व एक निश्चित मानसिक प्रवृत्ती बनली. ब्रिटिश शिक्षणातून जी जीवनमूल्ये त्यानी आत्मसात केली त्यामुळे त्यांच्या वैचारिक बैठकीवर मर्यादा पडल्या व त्या मर्यादांचे अडसर तोडणे त्यांना शक्य झाले नाही. सनदशीर राजकारणाची त्यांनी एकदा जी दीक्षा घेतली तिलाच ते अखेरपर्यंत चिकटून बसले. त्यांच्या निष्ठा, विचारप्रणाली व कार्यपध्दती बदलत्या परिस्थितीनुसार ते बदलू न शकल्यामुळे काळाच्या ओघात ते मागे पडले व बदललेल्या परिस्थितीला अनुरूप असे नवे नेतृत्व राष्ट्रीय चळवळीत पुढे येऊन त्याने राष्ट्रकार्याची धुरा खांद्यावर घेतली. परंतु यामुळे राष्ट्रीय संघटनेच्या पायाभरणीचे मवाळांनी केलेले कार्य गौण ठरत नाही. राष्ट्रीय सभेची मुहूर्तमेढ त्यांनीच रोवली, त्यानीच तिला मजबुती आणली. थंड गोळा होऊन पडलेल्या भारतीय सुशिक्षितांत पहिली राजकीय चेतना त्यांनी निर्माण केली. राष्ट्रकार्याची पाऊलवाट त्यांनी तयार केली. त्यांनी तयार केलेल्या पायांवर राष्ट्रीय कार्याची इमारत उभारणे पुढील पिढीला शक्य झाले.

## जहाल गट :

बदलत्या परिस्थितीच्या ओघात राष्ट्रीय कार्याचा अडू लागलेला गाडा नेटाने पुढे ओढण्याचे व परिस्थितीनुरूप त्याला नवा आशय व नवी दिशा देण्याचे कार्य जहाल गटाने केले. भारतीय समाजातील वाढत्या असंतोषाला कृतिशील बनविण्याचे व शब्दाना कृतीची जोड देण्याचे अवघड कार्य त्यांनी केले. आपआपले खाजगी व्यवसाय सांभाळून, फावल्या वेळी, आपली कातडी सांभाळून राष्ट्रीय राजकारण खेळण्याचे युग संपले असून, राष्ट्रकार्य हेच जीवनाचे सर्वस्व बनविण्याची वेळ आली आहे हे त्यांनी देशबांधवांच्या मनावर बिंबविले.[२९] स्वतःच्या वर्तणुकीने, उभी हयात राष्ट्रकार्याला वाहून घेणाऱ्या, शासकांच्या वक्रदृष्टीची तमा न बाळगता व जुलमी शक्तीला न जुमानता सर्व प्रकारच्या त्यागाची तयारी असलेल्या कार्यकर्त्यांचा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. भारतीय समाजावर पसरलेले निष्क्रियतेचे सावट त्यांनी दूर केले. समाजात रुजलेला न्यूनगंड नाहीसा केला. सशस्त्र क्रांतीचा मार्ग त्यानाही अव्यवहार्य वाटत होता. म्हणून त्यांनी सनदशीर निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग पुरस्कृत केला. त्यांच्या कार्यामुळे राष्ट्रीय चळवळीची बाल्यावस्था संपून ती सळसळत्या रक्ताच्या तारुण्यावस्थेत पदार्पण करीत असल्याची जाणीव त्यानी राज्यकर्त्यांना करून दिली.[30]

## अध्यात्मयुक्त राजकारण :

गोखलेंचे राजकीय विचार हे प्रामुख्याने नैतिकतेच्या पायावर उभे होते.[३१] आपल्या सार्वजनिक जीवनाला किंवा राजकारणाला अध्यात्माचे रूप यावे, हे गोपाळरावांचे प्रमेय प्रख्यात आहे. अध्यात्माला द्वैतभाव-दुजेपणा, आपपरभाव नको असतो. अद्वैत हे अध्यात्माचे अंतिम ध्येय वादातीत झाले आहे. स्वामी विवेकानंद या ध्येयाचाच युरोप - अमेरिकेत प्रचार करीत होते. राजकारणाचे अध्यात्म-अद्वैत ही शब्दयोजना गोपाळरावांनी भारतीय तत्त्वज्ञानाच्या आधारे केलेली आहे. धर्मभक्त ज्या तळमळीने होमहवन, उपासना, व्रतवैकल्ये, नित्यनेम, यमनियम आचरतात त्याच तळमळीने लोकसेवेची कामे बिनचूक पार पाडीत रहावे, असा त्या शब्दांचा अर्थ लावता येतो.

गोपाळरावांनी आपले सारे आयुष्य लोकसेवेच्या राजकीय अध्यात्माचरणात वेचले. राजकारणाचे अध्यात्म किंवा अध्यात्मयुक्त राजकारण हे शब्द पाहताच राजकारण, देवकारण, धर्मकारण, समाजकारण असे ध्येयपरत्वे भिन्न असते की काय अशी शंका येईल, म्हणून यासंबंधी आणखी थोडेसे विवेचन केले पाहिजे. हत्तीच्या पावलात इतर सर्वांची पावले समावतात त्याप्रमाणे ही सारी कारणे एकाच उध्दारकार्याची द्योतक आहेत, असे गोपाळराव समजत होते.

यासाठी गोपाळरावांनी भांडवल आणि व्यवहार हा दाखला दिला आहे. भांडवलातचे द्रव्य एकच असते, पण त्याच्या उपयोगाची क्षेत्रे निरनिराळी असतात. राजकारण, देव, धर्म, समाज ही क्षेत्रे आहेत. अध्यात्मगुणांच्या एकजिनशी भांडवलाचा विनियोग ज्याने त्याने आपल्या आवडीप्रमाणे निवडलेल्या कार्यक्षेत्रात करावयाचा असतो. धो.के. कर्वे यांनी स्त्रीशिक्षणाचे सामाजिक कार्यक्षेत्र निवडले, विवेकानंदानी भारतीय तत्वज्ञानाच्या प्रसाराचे कार्य स्विकारले, ना.म. जोशी यांनी कामगारांच्या सुधारणेचा विषय हाती घेतला, गोपाळरावांनी राजकारणाचा मार्ग धरला. परंतु त्या त्या कार्याचे भांडवल अध्यात्मचर्येचे द्रव्य एकच आहे. [३२]

## राजकारण व माणुसकी :

गोपाळरावांनी ज्या राजकारणात भाग घेतला ते राजकारण आता इतिहासाचा विषय झाले आहे. पण त्यांनी आपल्या जीवनाचा जो धडा देशाला घालून दिला त्याचे मोल कधीच कमी होणार नाही. देश हेच दैवत मानून त्यासाठी स्वार्थत्यागपूर्वक झिजणाऱ्यांना माणुसकीच्या बऱ्याचशा गुणांची गरज नसते अशी गोपाळरावांची भावना नव्हती. सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, स्वच्छता, इंद्रियनिग्रह या गुणांना "माणुसकी" या एका शब्दाने ओळखण्याचा सर्वमान्य प्रघात आहे. अशा माणुसकीच्या अभावी मनुष्य नावाचा द्विपाद चतुष्पादाहून खालच्या पायरीचा ठरेल. माणसाच्या बाह्य उध्दाराबरोबर

माणुसकीचा उध्दार होतो असा नियम नाही. उलट कुल, विद्या, बल, धन, अधिकार (व्यापार, कारखानदारी वगैरे व्यवसायातल्या धनिकत्वाचा किंवा सरकारी नोकरीतला) इत्यादी लाभांचे आधिक्य हे विनय, उपकारप्रवणता, सत्याची चाड, इंद्रियनिग्रह, अशा माणुसकीच्या गुणांना हाकलून लावते, असा अनुभव येतो. दुसऱ्याच्या कर्तबगारीची ओळख बाळगणे हे कमीपणाचे वाटू लागते. गोपाळरावांच्या जीवनाकडे पाहिल्यास ते आपल्या माणुसकीचा, समजू लागल्या-पासून मरेपर्यंत विकास करीत होते, असेच निश्चितपणे दिसून येते. जनतेमध्ये त्यांच्याविषयी आदर वाढला, पण त्यांच्यात अहंकार, गर्व, मद, हे दोष वाढले नाहीत. त्यांची कर्तव्यनिष्ठा नुसत्या भावनेची नव्हती, ती निष्ठा कर्तव्याच्या सार्थत गाढ ज्ञानावर आधारलेली होती. ती धनमानाविषयी निःस्पृह होती. कर्तव्याचरणाचे सुख कर्तव्यसिध्दीत नसते कर्तव्यचरणात असते, हा सुभाषितप्राय स्वानुभवाचा सिध्दांत ते खासगी संवादात व कित्येकदा जाहीर व्याख्यानातून बोलल्याचे दाखले पुष्कळ आहेत.[33]

## विद्यार्थी आणि राजकारण :

उच्च हेतूने व उत्कट आस्थेच्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांना देशसेवा करता येईल असे त्याना मार्गदर्शन झाले पाहिजे. शुध्द मनोरथ आणि उदार उत्साहाच्या भावना हा तरुणांचा एकप्रकारे विशेष हक्क असून त्याला धक्का न लावता त्यांचा तोल सुटणार नाही, त्यांच्या ठिकाणी जबाबदारीची जाणीव उत्पन्न होईल व देशाच्या गरजांचे खरेखुरे ज्ञान होईल, असा उपाय योजना पाहिजे.

आजचा विद्यार्थी हा उद्याचा नागरीक हा एक जुना सिध्दांत असून ज्या कल्पना व आकांक्षा तरुणांच्या मनाला निश्चितपणे वळण देतात, त्यांचे आज देशाला फार महत्त्व आहे, म्हणून त्याचे खोल विचाराने परीक्षण केले पाहिजे. पुढे त्यांच्यावर जी जबाबदारी पडणार आहे. तिच्या दृष्टीने त्या कल्पना-आकांक्षांच्या द्वारे कितपत तयारी होत आहे इकडे आस्थेने लक्ष दिले पाहिजे.[34]

हिंदी विद्यार्थी समाजाला राजकारणापासून परावृत्त करणे अशक्य आहे म्हणून त्यांना स्वच्छंदाने वागू द्यावे असे त्यांचे मत नव्हते. पण राजकारणाच्या कल्पना जेथे जशा मिळतील, तेथून तशाच त्यांना घेवू द्याव्या, ही वृत्ती सुध्दा त्यांना पसंत नव्हती. विद्यार्थ्यांना योग्य कार्यक्षम शिक्षण देण्याची कॉलेज-मधून व्यवस्था करण्याची आज आवश्यकता आहे. राजकारण त्यातल्या त्यात प्रचलित राजकारण यापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्याची कल्पना अतिशय घातक आहे. असे केल्याने विद्यार्थी आपल्या शिक्षकांकडून होणाऱ्या मार्गदर्शनाला मुकतात. शिक्षकाकडून मार्गदर्शन हा त्यांचा हक्क आहे. अशा मार्गदर्शनाने त्यांना महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांबद्दल संयुक्तिकपणाने आपली मते बनविणे शक्य होईल.[३५]

<u>वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय</u> :

हिंदी राजकारणाचा अभ्यास करीत असतांना गोपाळरावांनी इंग्रजी राज्यकारभारातले दोष जसे दाखवून दिले तसेच त्यांचे सामाजिक व राजकीय जीवनातील गुणही लक्षात घेतले होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अमेरिकेच्या स्वातंत्र्य युध्दानंतर त्यांच्या वसाहत विषयक धोरणात बदल केल्याचे कॅनडा वसाहतीचे उदाहरण गोपाळरावांच्या पुढे होते. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी ऑस्ट्रेलियाला इंग्लंडने स्वराज्य दिले. दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या वसाहतीचे बोअर इंग्रज असे ब्रिटिश साम्राज्यांतर्गत नवे संयुक्त स्वराज्य ब्रिटिशांच्या प्रेरणेने उदयाला आले. या उदाहरणामुळे भारतीयांचे ध्येय साम्राज्यांतर्गत वसाहतीचे स्वराज्य असले पाहिजे असे गोखल्यांचे मत बनले.

इंग्लंडला वसाहतीचे स्वराज्य मानवते. स्वराज्याची मागणी ते रागाने धिडकारीत नाहीत, हा अनुभव लक्षात घेवून दूरदृष्टीचे हिंदी पुढारी तशा मागणीची १८८० नंतर वाच्यता करु लागले होते.[३६] वसाहतीचे स्वराज्य हे ब्रिटिश साम्राज्याचे कांहीसे उदार धोरण शेकडो वर्षे चालू असल्याचे प्रसिध्द

होते. गोपाळराव शिक्षण घेत असतांना आयर्लंडला होमरूल - स्वराज्य देण्याची कल्पना पार्लमेंटपुढे आली. ती सफळ झाली नाही, परंतु हिंदी राजकीय विचारात या कल्पनेने मूळ धरल्याचा पुरावा १८७० सालानंतरच्या काळात प्रसिध्द होणाऱ्या बंगालच्या कांही वृत्तपत्रातून आढळतो.

आयर्लंडच्या स्थितीगतीकडे गोपाळरावांचे लक्ष असले तरी आयर्लंडचे उदाहरण ब्रिटिशांना चीड आणणारे होते. म्हणून त्याचा उच्चार गोपाळराव आपल्या भाषणलेखनाच्या व्यवहारामध्ये सहसा करीत नसत. आयरिश स्वातंत्र्याच्या इतिहासातील "होमरूल" हा शब्द १९१५ नंतर हिंदी राजकारणांत रूढ झाला. त्यापूर्वी वसाहतीसारखे स्वराज्य हे हिंदी राजकारणाचे अंतिम साध्य होते. १८८० सालापासून लोकांपुढे असलेले हे ध्येय गोपाळरावांनी "हिंदी स्वराज्य" या नावाने आपल्या बनारस कॉंग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात (१९०५) आणि १९०६ मध्ये लंडनला स्वतंत्रपणे एका व्याख्यानात स्पष्ट केले होते. हिंदी स्वराज्याच्या मागणीला १९०७ पासून आशिया खंडात तुर्कस्थान, इराण, चीन या देशातील लोकशाहीकडे झुकणारे राज्यक्रांतीचे वारेही उत्तेजन देत होते. त्याचा निर्देश गोपाळरावांच्या भाषणातून आढळतो.

वसाहतीच्या स्वराज्याची गोपाळरावांच्या ख्यातीत टवाळी करणाऱ्यांची देशामध्ये मोठी संख्या असली तरी पहिल्या जागतिक युध्दाच्या काळातील हिंदी राजकीय मागणी "ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य" या शब्दानीच व्यक्त केली जात होती. "वसाहतीचे स्वराज्य" याऐवजी त्या मागणीला "होमरूल" या शब्दानीच ओळखण्याची प्रथात पडला होता. गांधीच्या युगात एकदा निर्भेळ स्वातंत्र्याची भाषा प्रचलित झाली तेव्हा म. गांधींचे निस्सीम सहकारी चित्तरंजन दास यांनी त्या भाषेतल्या कल्पनेवर ताशेरा झाडून ब्रिटिशांचा संबंध तोडण्याच्या ध्येयाचे संभाव्य दुष्परिणाम निदर्शनास आणाले व स्वातंत्र्यवाद्यांच्या डोळ्यात चरचरीत अंजन घातले. १९३० साली कॉंग्रेसने पूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली असतांनाही म. गांधीनी वसाहतीच्या स्वराज्याची कल्पना सोडली नव्हती.[३७]

## हिंदी राज्यकारभारातील सुधारणा :

लंडनमध्ये "ईस्ट इंडिया असोसिएशन" म्हणून एक संस्था आहे. मिस मॅनिंग या सन्मान्य स्त्रीच्या देखरेखीखाली या संस्थेची वार्षिक सभा "इंम्पीरियल इन्स्टिटयूट" मध्ये भरली होती. या सभेपुढे गोपाळरावांनी स्वराज्य या विषयावर एक निबंध वाचला.[३८] या निबंधात त्यानी ब्रिटिश राजसत्ता हिंदुस्थानात आल्यापासूनचे थोडक्यात विवेचन केले असून हिंदी राज्यकारभारासंबंधी कांही सुधारणा सुचविल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे - "हिंदुस्थानातील सर्व बडया जागा गो-यांनी अडविल्या आहेत, जास्त अडवू पहात आहेत आणि तरुण, सुशिक्षित व लायक माणसांस चांगल्या जागा मिळत नाहीत. उद्योगधंदे बुडत चालले, दारिद्र्य वाढत चालले, शिक्षणाच्या नावाने तर आवळ्याऐवढे पूज्य, असा सर्वत्र नन्नाचा पाढा हिंदुस्थानात ऐकू येत होता. असे कां व्हावे ? जपानने आपली सर्वतोपरी भरभराट पाचपन्नास वर्षांत करुन दाखविली आणि जगास थक्क केले. हिंदुस्थानमध्ये हे निदान सुधारलेल्या राज्यकर्त्यांच्या शंभर वर्षांच्या कारकीर्दीत तरी झाले पाहिजे होते, परंतु झाले नाही आणि आणखी शंभर वर्षे जरी गेली तरी होईल असे दिसत नाही. लोक सुशिक्षित होऊ यात मग आम्ही त्यांस जास्त शिक्षण मिळाले म्हणजे राज्यकारभारांतही घेऊ. परंतु हे शिक्षण मिळणार कधी ? आणि ते जर कधीच मिळणार नसेल तर राज्यकारभारांतही भाग कधीच मिळणार नाही हे उघड आहे. गोपाळराव म्हणाले, आम्हाला कांही एकदम स्वराज्य नको. परंतु आज कांहीतरी जास्त हक्क दिल्याखेरीज गत्यंतर नाही. हे हक्क म्हणजे गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलात, एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलमध्ये आणि स्टेट सेक्रेटरीच्याही कौन्सिलात भरपूर सुधारणा करणे, त्याचप्रमाणे जिल्हाधिका-यांना मदत व सल्ला देण्यास प्रांतनिहाय व जिल्हानिहाय बोर्ड असावी. प्रथम दोन तीन वर्षे ही केवळ सल्ला देणारी असावी." परंतु पुढे त्या बोर्डाचा जिल्हाधिका-यावर दबावही असावा." यानंतर थोडया दिवसांनी गोखले हिंदुस्थानात परत आले.[३९]

इ.स. १९०८ मध्ये गोपाळराव राज्यसुधारणा लौकर जाहीर व्हाव्या

म्हणून लंडनला प्रयत्न करीत होते. त्या सुधारणांची वाटाघाट १९०६ पासून १९०९ पर्यंत लांबणीवर पडली होती. १९०५ मध्ये ज्या सुधारणा गोपाळ-रावांनी आपल्या मुलाखतीतून आणि व्याख्यानातून ब्रिटिश जनतेपुढे मांडल्या, किंबहुना १९०६ मध्ये मोर्लेसाहेबांच्या कानावर घातल्या, त्याच सुधारणा भारत-मंत्री आणि हिंदुस्थानातील गव्हर्नर जनरल यांच्यात घोटाळत होत्या. काळ बदलला, हिंदी जनतेमध्ये राजकीय आकांक्षांची अस्वस्थता उत्पन्न झालेली आहे. अशा वेळी भारतमंत्र्यांच्या व व्हाइसरॉयच्या कौन्सिलात योग्य हिंदी माणसांची नेमणूक करावी, कायदेमंडळातील हिंदी सभासदांची संख्या वाढवावी, त्यांना बजेटसंबंधात उपसूचना मांडण्याची सवलत असावी, ठराव आणावासा वाटल्यास तो आणण्याला मुभा असावी, वगैरे मागण्या प्रथम भारतमंत्र्याने गव्हर्नर जनरलला आपल्या हाती हिंदुस्थानचा कारभार येताच कळविल्या.

भारतमंत्र्यांनी पार्लमेंटमध्ये १९०८ च्या डिसेंबर १७ रोजी राज्यसुधारणाचे जे बिल ठेवले ते सकृद्दर्शनी क्रांतिकारक दिसणारे नव्हते, परंतु त्या सुधारणांत क्रांतीचे बीज होते. इंग्लंडच्या लोकशाही संस्था हिंदुस्थानात नकोत, ही दृष्टी अटळ राखून राज्य सुधारणांचा विचार येथे आणि विलायतेत चालला होता. एकदा मिंटोना मोर्लेसाहेबांनी लिहिले की, इंग्रजांच्या लोकशाही संस्था हिंदु-स्थानमध्ये नकोत हे एक वेळ मान्य करता येईल, पण इंग्लिशांच्या राज्यकर्तृत्वाच्या चैतन्याचा प्रभाव हिंदी शिक्षितांमध्ये संचरला आहे व तो प्रभाव दूर ठेवण्याला उपाय नाही. त्या प्रभावाच्या मागण्या थोड्या फार भागवून हिंदी जनतेला यावेळी संतुष्ट करून भारतातील इंग्रजी राज्याचा पाया भक्कम कसा राहील ते पाहावे. त्याप्रमाणे राज्यसुधारणा करण्यात आल्या. कायदेमंडळातील सभासदांची संख्यावाढ आणि एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलात एकदोन हिंदी गृहस्थांच्या जागा या दोन गोष्टी महत्त्वाच्या होत्या. वरिष्ठ कायदेमंडळात व्हाईसरॉयसह ६५, मद्रास, मुंबई, बंगाल आणि संयुक्त प्रांत, प्रत्येकी ४७, पूर्वबंगाल ३७, पंजाब २५, ब्रम्हदेश १७, अशी ठिकठिकाणची सभासदसंख्या ठरली. [40] या संख्येत सरकारी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

नेमणुकीच्या सभासदांचा समावेश होता. बाकीचा भाग तपशिलाचा होता. त्यामध्ये सभासदांना कांही सवलतीचे हक्क होते, परंतु हक्कांच्या अंमलबजावणी-वर नियंत्रण सर्वस्वी सरकारचे असल्यामुळे त्यांचा फायदा लोकांना मिळण्याची आशा नव्हती. तरी गोपाळरावांनी या सुधारणांचे स्वागत १९०८ साली मद्रासच्या कॉंग्रेस अधिवेशनात उत्साहाच्या तीव्र आशावादाने केले. मिळालेल्या हक्कांच्या संकुचित मर्यादेतसुध्दा कायदेमंडळाच्या सभासदांना कांही लाभ होतील असे गोपाळरावांच्या त्या भाषणाचे तात्पर्य होते. १९०६ पासून भिजत पडलेले राज्य सुधारणांचे बिल १९०९ च्या पहिल्या तिमाहीत बाहेर निघाले. गोपाळ-रावांनी सहाय्य केले म्हणून सुधारणाबिलाच्या तिसऱ्या वाचनाच्या वेळी मोर्ले यांनी पार्लमेंटात निर्देश केला. [४१]

## ना. गोखल्यांचे राजकीय इच्छापत्र :

इ.स. १९१४ साली पहिले महायुध्द सुरु झाले. या युध्दासाठी हिंदु-स्थानातून होणाऱ्या मदतीमुळे येथील राज्यकारभारात जास्त सुधारणा कराव्या असे ब्रिटिश राज्यकर्त्यांना वाटले. त्यांनी हिंदी जनतेच्या राजकीय मागण्या कळवाव्या असे येथील मध्यवर्ती व प्रादेशिक सरकारांना सुचविले. मुंबई प्रदेशात गोपाळरावांइतका विश्वासाचा दुसरा राजकारणातील मुरब्बी कोणी नाही, असे समजून मुंबईच्या गव्हर्नराने राज्यकारभाराच्या सुधारणांचा आराखडा तयार करुन पाठविण्याचे काम गोपाळरावावर सोपविले. हा आराखडा पक्का करण्यासाठी प्रथम फिरोजशाहा मेहता व आगाखान यांच्याशी विचारविनिमय करण्यासाठी गोपाळरावांनी कांही दिवसाची मुदत मागितली. गोपाळरावांच्या मनातून यासाठी मुंबईस जायचे होते, पण प्रकृतीने अडथळा केला आणि आगाखान-मेहतांना त्यांनी पुण्यास यावे म्हणून पत्रे पाठविली. १९१५ चा फेब्रुवारी महिना अर्धा संपून गेला तरी ते पुण्यास आले नाहीत.

गव्हर्नरांनी दिलेली मुदत संपून गेली तरी गोपाळरावांची राज्यसुधारणांच्या

आराखड्याविषयी हालचाल दिसली नाही. तेव्हा गव्हर्नराने निकड दाखविली व गोपाळरावांनी ता. १७ फेब्रुवारी रोजी आपल्या हाताने आराखडा लिहून काढला. [४२] असामान्य मनोनिग्रहाने लिहून काढलेल्या राज्यसुधारणांच्या स्परेषेला पुढे "गोखल्यांचे राजकीय मृत्यूपत्र" असे नाव पडले. गोपाळरावांच्या हातचा विचारपूर्वक लिहिलेला हा शेवटचा लेख होता.

गोखल्यांच्या मृत्यूनंतर या आराखडयाच्या तीन प्रती करून एक लॉर्ड विलिंग्टन, दुसरी फिरोजशाहा मेहता व तिसरी ना. आगाखान यांच्याकडे पाठविण्यात आली. ना. आगाखानांनी हा ना. गोखल्या-चा आराखडा इंग्लंडमध्ये प्रथम प्रसिध्द केला आणि ना. शास्त्रीनी हिंदुस्थानात प्रथम प्रसिध्द केला. गोखल्यांचा हा आराखडा हिंदुस्थानला कमीत कमी काय मिळाले पाहिजे याचाच निदर्शक होता आणि त्या सुधारणा ब्रिटिश सरकारने आपण होऊन एकदम द्यावयाच्या होत्या. युध्दोत्तर हिंदुस्थानच्या इतिहासात एकतेजस्वी प्रकरण सुरु करण्याचा तो श्रीकार होता. वास्तविक ना. गोखल्यांना वसाहतीच्या बरोबरीचे राजकीय हक्क असलेले स्वराज्य हिंदुस्थानसाठी हवे होते. शांततेने व प्रगतीची ठाम पावले टाकून स्वायत्त होणे हे गोखल्यांच्या धोरणाचे सूत्र होते. [४३]

ब्रिटिशांच्या आगमनामुळे देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनात अनेक बदल घडू लागले. विद्येचे प्रवेशद्वार सर्वांना खुले झाले. त्यामुळे पश्चिमी जगात कोणत्या घडामोडी होत आहेत हे भारतीयांना कळू लागले. भारतीय समाजातही अशा सुधारणा झाल्या पाहिजेत असे त्यांना वाटू लागले.

ब्रिटिशांच्या आगमनामुळे देशात अनेक प्रकारच्या सुधारणा होत असतांना पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणे अयोग्य ठरेल असे गोखले यांचे मत होते. ब्रिटिश सत्ता त्यावेळी प्रबळ होती. लष्करी सामर्थ्याच्या प्रदर्शनाने लोक हतबल झाले होते. अशावेळी ब्रिटिश सत्तेला उघडपणे विरोध न करता सनदशीर मार्गाचा अवलंब त्यांनी केला. ब्रिटिश मुत्सद्यांना भारतीय प्रश्नांची निकड पटवून देण्याचा त्यानी सतत प्रयत्न केला.

१९०५ मध्ये बनारस काँग्रेसचे ना. गोखले अध्यक्ष झाले. पुढे जहालवादी व नेमस्तवादी असे दोन गट पडले. गोखले नेमस्त गटाचे अध्वर्यु होते. त्यांच्या विचारावर उदारमतवादाचा प्रभाव होता. तसेच ब्रिटिशांच्या न्यायबुध्दीवर त्यांचा विश्वास होता. ब्रिटिश लोक सर्वच बाबतीत आपल्यापेक्षा वरचढ असल्यामुळे त्यांना गुरूस्थानी मानून आपली सर्वांगिण प्रगती साधता येईल असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी सतत सनदशीर मार्गाचा अवलंब केला.

......

## प्रकरण चौथे

## सं द र्भ

१) क्वार्टर्ली जर्नल ऑफ द पूना सार्वजनिक सभा, जानेवारी १८९८, पृ. ९५.

२) नंदा बलराम, गोपाळ कृष्ण गोखले, ब्रिटिश राजवट आणि भारतीय नेमस्त युग, विश्वकर्मा साहित्यालय, २०३५/२ सदाशिव पेठ, टिळक पथ, पुणे ४११ ०३०, आक्टोबर, १९८६, पृ. ८४, ८५.

३) उक्त, पृ. ८६.

४) उक्त, पृ. ८६.

५) पर्वते त्र्यं. वि. गोपाळ कृष्ण गोखले, अहमदाबाद, १९५९, पृ. २४.

६) कर्वे व आंबेकर (संपादित) स्पीचेस अँड रायटिंग्ज ऑफ गोखले, खंड ३, पृ. २८८.

७) बॅनर्जी सुरेन्द्र नाथ, ए. नेशन इन द मेकिंग, कलकत्ता, १९६३, पृ. १२८.

८) मिसलेनियस रायटिंग्ज ऑफ एम्. जी. रानडे, पृ. २३१, २३२.

९) नंदा बलराम उक्त, पृ. ९३.

१०) स्पीचेस ऑफ गोपाळ कृष्ण गोखले, ३ री आवृत्ती, मद्रास १९२०, पृ. ७८१.

११) उक्त, पृ. ७८९.

१२) रानडे रमाबाई, रानडे हिज वाइफ्स रेमिनिसेन्सीस, दिल्ली, १९६३, पृ. ९.

१३) नंदा बलराम, उक्त, पृ. ९४.

१४) फडके य.दि., विसाव्या शतकांतील महाराष्ट्र खंड-१, श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पुणे-३०, प्रथमावृत्ती १९८९, पृ. ६४.

१५) समाज प्रबोधन पत्रिका, २५ जानेवारी-फेब्रुवारी १९६९, लेखक - प्रभाकर पाध्ये, लेख - महाराष्ट्रीय विचारवंतांची परंपरा, पृ.१६.

१६) उक्त, पृ. १६.

१७) Vidya Dhar Mahajan, Leaders of the Nationalist Movement, Sterling Publishing Pvt. Ltd., New Delhi - 110 016, First Edition 1975, Page No. 93.

१८) कुंझरू पंडित -हृदयनाथ, गोपाळ कृष्ण गोखले, व्यक्ती आणि कार्य, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली, ९ मे, १९६६, पृ.१२, १३.

१९) उक्त, पृ. १३.

२०) उक्त, पृ. १३, १४.

२१) तळवलकर गोविंद, नौरोजी ते नेहरू, प्रकाशक - केशव विष्णू कोठावळे, मॅजिस्टिक बुक स्टॉल, गिरगाव नाका, मुंबई-४, सन १९६९, पृ. १०९.

२२) नवभारत, डिसेंबर १९८५ जानेवारी-फेब्रुवारी, १९८६, पृ. १.

२३) लोकशिक्षण, डिसेंबर, १९३५, लेखक - प्रा. शं.द. जावडेकर, लेख - राष्ट्रीय सभा व तिचे कर्णधार, पृ. ४१२.

२४) देशपांडे गोपाळ आबाजी, काँग्रेस कथा, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला पुष्प ३८ वे काँग्रेस हिरक महोत्सव डिसेंबर, १९८६, पृ. ३१.

२५) मिश्र राजनारायण बी.ए. इंडियन प्रेस लिमिटेड प्रयाग, १९३४, पृ.१४७.

२६) खरे भा.द., लोकमान्य टिळक दर्शन, केसरी प्रकाशन, पुणे, १९७२, पृ. ७७, ७८.

२७) लोकशिक्षण, डिसेंबर, १९३५ उक्त, पृ. ४१४.

२८) वैद्य सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाकरिता विद्या बुक्स औरंगपूरा, औरंगाबाद प्रथमावृत्ती, १९८५, पृ. २२९.

२९) उक्त, पृ. २३०.

३०) उक्त, पृ. २३०.

३१) Gokhale - A Political Biography, By - D.B. Mathur, Manaktalas, Bombay, First Published, 1966, Page No.396.

३२) फाटक नरहर रघुनाथ, आदर्श भारत सेवक, गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र, मौज प्रकाशन, खटाववाडी, मुंबई-४, पृ. ३३८. प्रथमावृत्ती १९६७

३३) उक्त, पृ. ३३६.

३४) उक्त, पृ. ३८३, ३८४.

३५) उक्त, पृ. ३८४.

३६) फाटक नरहर रघुनाथ, उक्त, पृ. ३०३.

३७) उक्त, पृ. ३०५.

३८) साने गुरुजी, नामदार गोखले चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९२५, पृ. १२८, १२९,

३९) उक्त, पृ. १२९.

४०) फाटक नरहर रघुनाथ, उक्त, पृ. १४४.

४१) उक्त, पृ. १४४, १४५.

४२) उक्त, पृ. २८७.

४३) गोखले पुरुषोत्तम पांडुरंग, नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र, नीलकंठ प्रकाशन, पुणे-९, प्रथमावृत्ती, १९६६, पृ.१३४.